Janiv Aplya Jababdarichi

www.apulkee.org

Press note

ऋणमुक्ती एक प्रवास.....

यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मूसळ गावची विधवा महिला शेतकरी श्रीमती. बेबीताई वासुदेव लाकड़े ह्या मागील तीन वर्षापासून अतिशय बिकट परिस्थिती मध्ये जगत होत्या. नवरा गेल्या नंतर सुद्धा अत्यंत गरीब परिस्थितीत आपला जन्मतःच अपंग असलेला 22 वर्षीय अबोल मुलाला सोबत घेवून आयुष्याशी त्या दोन हात करत होत्या. त्यांच्या सोबतीला होते 5 एकर कोरडवाहू शेती आणि सतत 3 वर्षा पासुन पडलेला दुष्काळ. त्यांच्या वर 38 हज़ार रूपयांचे पिक कर्ज थकित होते जे सततच्या नापिकी मुले त्याना भरने अशक्य होते. तरी हि माउली ह्या बिकट परिस्थितीशी लढा देत होती आणि आलेला दिवस पेलत होती.

श्रीमती. सुभद्रा बाई लक्ष्मन मानमोडे, गाव पिंपरी खुर्द , तालुका अकोट, जिल्हा अकोला. वय ७० . नवरा आजाराने गेला. आयुष्याच्या लढाई साठी हातात अडीच एकर कोरडवाहू शेती आणि दोन करती मुल. त्यातील एका मुलाला जिभेचा पराल्य्सीस झाला आणि वाचा गेली . औरंगाबाद सरकारी दवाखान्यात उपचार सुरु आहेत. मुलाच्या महिन्याचा औषधाचा खर्च १०००० रुपये. बँकेचे ४५ ७९० रुपये पिक कर्ज थकित होते पण आयुष्याशी लढाई सुरु आहे.

श्रीमती ललिता संतोष  गुडधे, वय ३३ , राहणारे आर्वी , समुद्रपूर तालुका, जिल्हा वर्धा , पतीचा शॉक लागून अपघाती मृतू. लहान मुलाला घेवून  5 एकर शेती सोबत आयुष्याशी लढा सुरु आहे, समुद्रपूर सहकारी बँकेचे २२००० पीककर्ज थकित.

वरील सर्व माहिती आहे आपुलकी सामाजिक संस्थेच्या जागृती ह्या उपक्रमातील काही लाभार्थींची . जिल्हा बदलतो , गावे बदलतात, माणसे बदलतात पण परिथिती मात्र बदलत नाही. ग्रामीण भागात सर्वत्र निराशाच दिसते आहे तरीही प्रत्येक माणूस आपल्या आपल्या परीने परिस्थितीशी दोन हात करतो आहे . फक्त गरज आहे ती पाठीवार हाथ ठेवून लढ म्हणण्याची आणि थोडीशी आर्थिक मदत करून त्यांना ह्या चक्रव्हुहातून बाहेर काढण्याची. हि जवाबदारी कुणाची आहे त्यात एकमेकांकडे बोटे दाखवण्यापेक्षा आपला आपला खारीचा वाटा उचलण्याची.

कोरडवाहू अल्पभूदारक शेतकऱ्यांचे संपूर्ण कंबरडे मागील तीन वर्षाच्या सततच्या नापिकी मुळे मोडले आहे. कधी दुष्काळ तर कधी गारपीट ह्या चक्रात शेतकरी पूर्णपणे अटकला आहे. सोबत शेतमालाच्या भावाचे सुलतानी संकट आहेच. त्यामुळे असे हजारो शेतकरी कर्जबाजारी होवून स्वताचे आयुष्य संपवण्याच्या वाटेवर आहेत. फक्त ते विजय मल्ल्या नसल्यामुळे भारत सोडून जाऊ शकत नाहीत म्हणून ते जग सोडून जातात . त्यांची कर्ज भरण्याची इच्छा असूनही ते कर्ज भरू शकत नाहीत. ह्या लोकांची कर्ज मुक्ती होणे फार आवश्यक आहे. जगाचा पोशिंदा जर अडचणीत असेल तर त्याच्या मागे व्यवस्थेला उभे राहणे अवश्यक आहे.

हि संकल्पना सोबत घेवूनच आपुलकी सामाजिक संस्था विदर्भातील ५ जिल्हातील १२२ शेतकरी कुटुंबांना कर्जमुक्तीचा दिलासा देण्याचा प्रयत्न करती आहे. ह्या उपक्रमाचा पहिला टप्पा दिनांक १६ आणि १७ तारखेला विदर्भातील पाच जिल्हातील ११ गावात २९ शेतकर्यांना कर्जमुक्त करून पूर्ण करण्यात आला . समाजातील संवेदनशील लोकांनी पुढे येवून हि जवाबदारी उचलली आणि शेतकऱ्यांचे ८,७९ ,३०० रुपयाचे पिककर्ज स्वता फेडले.

ह्या उपक्रमाचा समोरील टप्पा अतिशय बिकट आहे . आम्हाला ह्या उपक्रमाच्या दुसर्या टप्प्यात आम्ही ९४ शेतकऱ्यांना मदत करणार असून  त्यासाठी ७७ लाखाचा निधी रुपयांचा निधी उभारण्याची गरज आहे. तेव्हा आम्ही ह्या बातमीच्या माध्यमाने समाजातील संवेदनशील लोकाना हातभार लावण्याचे आव्हाहन करतो आहोत.

आपुलकी सामाजिक संस्थेचे आज पर्यंत केलेल्या कामाचे संपूर्ण विवरण त्यांच्या संकेत स्थळ www.apulkee.org वर उपलब्ध आहे. पुना मुंबई तील आ. टी. क्षेत्रात काम करणारी मुल ह्या संस्थेच्या मार्फत मागील चार वर्षापासून कृषी क्षेत्रासाठी काम करता आहे.

ह्या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजित फाळके, संस्थापक अध्यक्ष , आपुलकी , मयुरी धवले, सायोजीका जागृती अभियान, योगेश देशमुख, अनुप भुतडा, गजानन बोरोकार, मिथुन मोंढे , प्रकाश साबळे , मिलिंद फाळके , नंदू गावंडे , अनंत सपकाळ, हनुमान खैरकार, स्वप्नील देशमुख, संतोष अडसड , निखिल जैत, गोपाल चव्हाण , प्रसाद नायगावकर ,गौरव नाइकर, सुवर्धन खिल्लारे, रवि मार्षेटवार, सागर जामगडे, विजुभाऊ विल्हेकर, ललित बाहाळे हे लोक परिश्रम घेत आहेत.

आपला नम्र

अभिजित फाळके

संस्थापक अध्यक्ष

आपुलकी सामाजिक संस्था ,पुणे

मोबाईल - ८९८३३५७५५९

fabhijeet1980@gmail.com






अमरावती विभागातील



